# बृहन्मुंबई महानगरपालिका

## (सहाय्यक अभियंता खाते )

**विषय :** एल विभाग प्रशासकीय इमारतीची साफसफाई करण्याकरिता हाऊसकिपींगची सेवा पुरविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता दि. **01.04.2024** ते **30.09.2024** या कालावधीकरीता जाहीरात देऊन सोडतीद्वारे संस्थेची नियुक्ती करण्याबाबत.

**स्वारस्य अभिव्यक्ती**

**जाहिरात**

'एल' विभाागामध्ये प्रशासकीय इमारतीची साफसफाई करण्याकरिता हाऊसकिपींगची सेवा पुरविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता अशासकीय संस्थेची नेमणूक करण्यासाठी 'एल' विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. (कालावधी दि. **01.04.2024** ते **30.09.2024**)

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| 1 | एल विभाग प्रशासकीय इमारतीची साफसफाई करण्याकरिता हाऊसकिपींगची सेवा पुरविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरिता संस्थेची नियुक्ती करणे. | 1 |

'एल' विभागातील इच्छूक पात्र संस्थानी दि. 11.03.2024 ते 18.03.2024 सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 या वेळेत 'एल' विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) यांचेकडुन रुपये 3000/- + 18% जिएसटी इतक्या रक्कमेचे चलान घेऊन, सदर चलनाचा भरणा 'बृहन्मुंबई महानगरपालिका' (BMC) या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी. व्दारे नागरी सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर अर्जाचा नमुना देण्यात येईल. पात्र यादीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थेला कामाचे वाटप सहाय्यक आयुक्त 'एल' विभाग, योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

'एल' विभागातील इच्छुक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व शपथपात्राच्या नमुन्यासाठी सहाय्यक अभियंता (परिरक्षण) 'एल' विभाग / मुख्य लिपिक (व्यय) 'एल' विभाग कार्यालयात संपर्क साधावा. 'एल' विभागातील इच्छुक संस्थेने 'एल' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. 19.03.2024 रोजी दुपारी 5.00 वाजेपर्यंत आहे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

सहाय्यक अभियंता (परि.) 'एल' विभाग